# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ५४६ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ११/१०/२०१८

## उत्कृष्ट तपास करणारे पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा सत्कार

भंडारा :— दिनांक ०९.१०.२०१८ रोजी बैठक सभागृह पोलीस मुख्यालय भंडारा येथे श्रीमती विनीता साहू, मा. पोलीस अधिक्षक जिल्हा भंडारा, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांचे मार्गदर्शनात उत्कृष्ट तपासी अधिकारी म्हणुन श्री. संजय जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा यांचा प्रशस्तीपत्र देऊन येथोचित गौरव करण्यात आला. तसेच पोलीस हवालदार राजेद्रवंशी गोंडाणे, पोलीस हवालदार भाष्कर भोंगाडे यांनी दारुबंदी कायदया अंतर्गत दाखल गुन्हयात आरोपीस शिक्षा झाल्याबाबत गुन्हयात उत्कृष्ट तपास केला आहे. त्याचप्रमाणे पोलीस नाईक अनिल कळपते यांनी सार्वजनीक ठिकाणी अश्लिल शिवीगाळ करणाऱ्या गुन्हयात उत्कृष्ट तपास केल्याबद्दल आरोपीस न्यायालयात शिक्षा झाल्याबाबत प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. सोबतच उपविभाग तुमसरचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विक्रम साळी उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर यांनी उत्कृष्ट प्रतिबंधक कारवाई व विशेष तपास मार्गदर्शन, गुन्हे वेळेत निकाली काढणे अशी पोस्टेची दैनदिंन कामे तत्परतेने करुन घेतले बाबत त्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. श्री. गजानन कंकाळे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कारधा यांना विशेष तपास मार्गदर्शन केल्याबाबत प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. पोलीस स्टेशन साकोली उत्कृष्ट दोषसिध्दी दर राखल्या बाबत व CCTNS DATA ENTRY मध्ये उल्लेखनीय काम केल्याबाबत पोलीस स्टेशन आंधळगाव तसेच मपोना. प्रमोदिनी निखाडे पोलीस स्टेशन साकोली यांनी CCTNS DATA ENTRY मध्ये उल्लेखनीय काम केल्याबाबत प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हातील उत्कृष्ट तपासी अधिकारी, उपविभागात पोलीस स्टेशनला विवीध विभागात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन येथोचित गौरविण्यात आले. याप्रसंगी मा. पोलीस अधिक्षक यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी यांना सर्व गुण्याचे तपासात तंत्रशुध्द तपास पध्दतीचा वापर करावा व आरोपीतांना शिक्षा होईल याकडे लक्ष देण्याबाबत मार्गदर्शन केले. उपविभागीय, पोलीस स्टेशन स्तरावर नागरीकांस दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा अधिक गुणवत्तापुर्ण करुन पोलीस स्टेशनचे एकुण कामकाजाचा दर्जा सुधारण्या बाबत सुचना दिल्या.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता